# बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार आजही कालसुसंगत : वंदना भेंडे

## महिला आश्रम अध्यापिका विद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाणदिन

*प्रतिनिधी / ८डिसेंबर*

**वर्धा :** भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनी महिला आश्रम अध्यापिका विद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विषमतेचे चटके सोसूनही प्रचंड ज्ञान लालसा व व्रतस्थ विद्यार्थी म्हणून नाव लौकिक मिळवलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आजही काळ सुसंगत आहेत, असे विचार महिला आश्रम अध्यापिका विद्यालयाच्या प्राचार्य वंदना भेंडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्य वंदना भेंडे, साधना मेंढे या प्रमुख वक्त्या होत्या. किरण रिंगणे, ज्ञानेश्वर घुगे, रीना परतेती, सुचिता राऊत, माधुरी



देशमुख, शुभांगी माले व जयदे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात 'भारतीय संविधाचा शिल्पकार आहे' या गीताने झाली. विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बालपण, त्यांचे शिक्षण तसेच स्त्रीया व समाजासाठी त्यांनी केलेले असमान्य कार्य आपल्या भाषणातून व्यक्त केले. साधना मेंढे यांनी बाबासाहेबांनी समाजाता स्त्रियांच्या उत्कर्षासाठी केलेल्या कार्याविषयी माहिती दिली. स्त्रियांच्या उन्नातीशिवाय समाज प्रगती करूच शकत नाही, म्हणूनच हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांना कायद्याने हक्क व दर्जा प्राप्त करून देण्याचे स्वप्न आंबेडकरांनी पहिले, असे त्या म्हणाल्या. भेंडे भाषणात म्हणाल्या की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ज्ञानलालसा व विद्वता अफाट होती व त्यासाठी भरपूर कष्ट घेतले, परदेशात असताना प्रसंगी उपाशी राहून दिवसभर ग्रंथालयात बसून अभ्यास केला. विपुल असे ग्रंथलेखनही केले. ध्येय सिद्धीसाठी कठोर साधना केली. शिक्षणातून चरित्र संपन्न व समाजभिमुख पिढी घडावी यासाठी शिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट केली. हीच ज्ञान लालसा प्रत्येक विद्यार्थ्यात असली पाहिजे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन दीक्षा दखने हेने केले. कविता इंगोले, दीक्षा भोयर, प्रगती नेवारे, योगिनी झोडे यांनी विचार व्यक्त केले. समीक्षा काकडे ने आभार मानले. शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.